महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

email : ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११

जा.क्र. : औसंवि/अ/ २८५७७                                                                 दिनांक : ०२/०७/२०१३.

# परिपत्रक

**विषय:** इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९९६ (The Building and Other Construction Workers Welfare Cess Act-1996) व इमारत व बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम, १९९८ (The BOCWWC Rules-1998) अंतर्गत उपकर वसुलीबाबत.

**संदर्भ-:** १) शासन परीपत्रक क्र.बीसीए १२००७/प्रक्र.७८८/कामगार-७ दि.२१.०४.२००८.
२) महाराष्ट्र शासन अधिसुचना क्र.बीसीए२००८/प्र.क्र.९०७/कामगार-७ दि.१६.०४.२००८
३) शासन अ.शा.प. क्र.बीसीए २००७/प्रक्र.७८८/कामगार- ७अ दि.२६.१०.२००९.
४) शासन निर्णय क्र.बीसीए २००९/प्रक्र.१०८/कामगार-७-अ दि.१७.०६.२०१०.

**************

महाराष्ट्र शासनाने, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. बीसीए२००९/प्र.क.१०८/कामगार ७-अ/मंत्रालय, मुंबई -३२, दि. १७/६/२०१० अन्वये इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ तसेच इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम १९९८ अंतर्गत उपकर वसूल करावयाची कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार उपकर वसुलीच्या आदेशाची अंमलबजावणी करणेसाठीचा विषय व्यवस्थापनाच्या विचाराधीन होता. त्यानुषंगाने व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचालन) व संचालक (प्रकल्प) यांच्याशी विचार विनियमन करुन उपकर वसुलीच्या आदेशाची अमलबजावणी महावितरण कंपनीमध्ये करण्यास मंजूरी दिलेली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वरील संदर्भीय परिपत्रकानुसार उपकर वसुलीच्या आदेशाची अंमलबजावणी करणेसाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती नमूद करण्यात येत आहे.

१. जी इमारत व इतर बांधकामे 'इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६' च्या कलम २(१) (डी) अनुषंगाने येतात व ज्याचे काम घेण्यासाठीचा करार दि.१ जुलै २०१० नंतर करण्यात आलेला आहे. अशा सर्व इमारत व इतर बांधकामाना हा अधिनियम लागू राहील व उपकर वसुली करावी लागेल.

२. "इमारत व इतर बांधकाम" ची व्याख्या (कलम २ (डी)) मध्ये दिलेली आहे. बांधकाम, फेरफार, दुरुस्ती, देखभाल किंवा पाडून टाकणे इत्यादी. इमारत, रस्ते,मार्ग, रेल्वे, ट्रामवेल, एअर फिल्डस, पाटबंधारे, जलनिसारण, बंधारा नेव्हीगेशन काम, पुर नियंत्रणाचे काम (वादळामुळे जलनिसारणाच्या कामासहीत) तेल व वायुची जोडणी टाकणे, **विद्युत लाईन्स,** वायरलेस, रेडीओ, टेलीव्हिजन, टेलीफोन, टेलीग्राफ आणि समुद्रापार दळणवळण, धरणे, कालवे, जलाशये, जलप्रवाह,बोगदे पुल,सेतु प्रणाली, पाईपलाईन, **टॉवर्स, कुलीग टॉवर्स, पारेषण टॉवर्स** आणि या प्रकारचे इतर कामे समुचित शासन अधिसुचनेद्वारे लागू करू शकते परंतू कारखाने

अधिनियम, १९४८ किंवा खाण अधिनियमन, १९५२ च्या तरतुदी ज्या आस्थापनेस लागू होतात त्यांना इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियमाच्या तरतुदी लागू होणार नाहीत.

३. **"मालक"** (Employer) ची व्याख्या कलम २ (i) मध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे:-

"Employer" in relation to an establishment, means the owner thereof and includes,-

(i) In relation to a building or other construction work carried on by or under the authority of any department of the Government, directly without any contractor, the authority specified in this behalf or where no authority is specified, the Head of the Department;

(ii) In relation to a building or other construction work carried on by or on behalf of local authority or other establishment, directly without any contractor the Chief Executive Officer of that authority or establishment;

**(iii) In relation to a building or other construction work carried on by or through a Contractor, or by the employment of building workers supplied by a Contractor, the Contractor;**

४. **महावितरण कंपनीत खालीलप्रमाणे दर्शविलेले अधिकारी वसुली, निर्धारण व अपिलीय अधिकारी म्हणून काम पाहतील.**

**अ) कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता तसेच मुख्य अभियंता किंवा कामाचा आदेश जारी करणारा कोणताही अधिकारी हे वसुली अधिकारी म्हणून काम पाहतील.**

**ब) प्रादेशिक कार्यकारी संचालक, कार्यकारी संचालक (सां.नि.) हे निर्धारण अधिकारी म्हणून काम पाहतील.**

**क) व्यवस्थापकीय संचालक, महावितरण हे अपिलीय अधिकारी म्हणून काम पाहतील.**

५. इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर वसुल करताना, बांधकामाच्या एकूण मुल्यानुसार (जमीनीची किंमत वगळून) तसेच संबंधीत आस्थापनाने कामगारांना किंवा त्यांच्या नातलगांना कामगारांसाठी कर्मचारी नुकसान भरपाई अधिनियम १९२३ मधील तरतुदीनुसार कोणत्याही प्रकारची भरपाई दिलेली असेल ती रक्कम वगळून उर्वरीत बांधकाम मुल्यावर १ % (एक टक्का) उपकर वसुल करावयाचा आहे. हा उपकर खाजगी तसेच शासकीय बांधकामावर देखील वसुल करावयाचा आहे.

६. **उपकर अधिनियमाच्या कलम ३ व नियम ४ (३) या तरतुदीनुसार बिलातून १ %** उपकर कपात करण्याबाबत_निर्गमित केलेल्या अधिसुचनेच्या अनुषंगाने **कपात केलेल्या उपकराच्या रकमेचा धनादेश महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचा खाते क्रमांक "००४२२०११००००१५३" बँक ऑफ इंडीया, मुंबई. या बँकेच्या महाराष्ट्रातील कोणत्याही शाखेत विहीत चलनाद्वारे जमा करावयाचा आहे.** या चलनाची चार प्रतीत विभागणी असून दोन प्रती बँक स्वत:कडे ठेवून, उर्वरीत दोन प्रती भरणा करणाऱ्या व्यक्तीस (रेमिटरकडे) देण्यात येईल. सदर भरणा करणाऱ्याने एक प्रत सचिव, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडल यांना पाठवावयाची आहे. दर महिन्यांच्या १० तारखेपुर्वी उपकरापोटी जमा करण्यात आलेल्या रकमेचा तपशील दर्शविलेल्या मासिक तक्त्यात परिशिष्ट -३

मध्ये उपकरभरणा करणाऱ्याने परिच्छेद क्र. ७ - ब मध्ये नमुद केलेल्या कल्याण मंडळाकडे सादर करावयाचा आहे. तसेच परिशिष्ट -४ मध्ये नमुद केलेल्या तक्त्यात शासकीय विभाग, स्थानिक संस्था व सार्वजनिक उपक्रम यांनी वार्षिक विवरण पत्र परिच्छेद क्र. ७ - ब मध्ये नमुद केलेल्या कल्याण मंडळाकडे सादर करावयाचे आहे.

७. उपकर वसुल करुन संबंधीत खात्यात भरण्याची पध्दत-

अ) उपरोक्त परिच्छेद क्र. ०२ मध्ये नमूद केलेल्या कामास / बांधकामास परवानगी / मंजूरी देण्याच्या प्रत्येक प्रकरणास संबंधीत वसुली अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी एक युनिक क्रमांक द्यावा व हा क्रमांक बांधकाम / काम सुरु करण्याच्या प्रमाणपत्रात नमूद करावा.

ब) इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकराची रक्कम परिच्छेद क्र. ०४ मध्ये नमूद केलेले वसुली अधिकारी यांनी धनाकर्षाद्वारे इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडे जमा करायची आहे. त्याकरिता देय होणाऱ्या उपकराची रक्कम महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ यांचे नावे मंडळ खाते क्रमांक. ००४२२०११००००१५३, बँक ऑफ इंडियामध्ये वसुली अधिकारी यांनी उपकर वसुली केल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत जमा करावी. तसेच **अशाप्रकारे वसूल केलेल्या उपकरासंबंधीचा तपशिल अध्यक्ष, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ, कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, सी-२० रिझर्व बँकेच्या मागे, सिटी पार्कच्या बाजूला, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१ यांचेकडे पाठवावा.**

८. सर्व उपकर वसुली / निर्धारण अधिकाऱ्यांनी उपकर वसुलीच्या प्रक्रियेमध्ये सुसूत्रता यावी या दृष्टीने प्रत्येक प्रकरणास एक युनिक क्रमांक द्यावा. बांधकाम सुरु करण्याचे आदेश (Permission) किंवा अनुज्ञप्ती यामध्ये हा युनिक क्रमांक देणे आवश्यक असेल. प्रत्येक प्रकरणात द्यावयाचा हा युनिक क्रमांक १७ अंकी असून या युनिक क्रमांकामधील-

अ) पहिले चार अंक वर्ष दर्शवितील,

ब) दुसरे दोन अंक परिमंडळ कार्यालय कोड दर्शवितील,

क) त्यानंतरचे तीन अंक मंडल / विभाग कार्यालय कोड दर्शवितील,

ड) त्यानंतरचे दोन अंक निर्धारण अधिकारी यांचा प्रकार दर्शवितील महावितरणकरिता सर्व ठिकाणी हा कोड "०२" राहील.

ई) त्यापुढील चार अंक कर वसुली / निर्धारण अधिकाऱ्याने दिलेला प्रकरणाचा क्रमांक दर्शवितील,

फ) त्यापुढील दोन अंक बांधकामाचा टप्पा दर्शवितील. (बांधकाम एका टप्प्यात पूर्ण होत असल्यास हे दोन अंक ०० असे असतील)

या युनिक कोड संदर्भात वापरावयाचे परिमंडळ कार्यालय कोड, मंडल / विभागीय कार्यालय कोड, निर्धारण अधिकारी कोड सोबतच्या **प्रपत्र -अ** मध्ये दर्शविल्याप्रमाणे असतील.

उदा. एका युनिक कोडचे उदाहरण खाली दिलेले आहे.

उदा. अमरावती परिमंडळातील अकोला मंडलांतर्गत अकोला ग्रामीण विभागाने परिपत्रकातील परिच्छेद क्र. ०२ मधील कामाचा आदेश दिल्यास युनिक कोड खालीलप्रमाणे राहील.

अमरावती परिमंडल, अकोला - परिमंडल कोड - ०२, मंडल / विभागीय कार्यालय कोड - अकोला ग्रामीण कोड-००१, निर्धारण अधिकारी कोड- महावितरण कंपनीकरिता कोड - ०२, कामाच्या आदेशाचा प्रकरण क्रमांक - अकोला ग्रामीण विभागातील प्रकरण क्रमांक -०००१, बांधकामाचा टप्पा - ०० (बांधकाम एका टप्प्यात

पूर्ण होत असल्याने) अकोला ग्रामीण विभागातील बांधकाम टप्पा-*०० (*बांधकाम एका टप्प्यात पूर्ण होत नसल्यास ०० ऐवजी ०१ असेल)

| वर्ष कोड | | | | परिमंडळ कोड | | मंडळ कोड / विभाग कोड | | | निर्धारण अधिकारी कोड | | कामाच्या आदेशाचा प्रकरण क्रमांक | | | | बांधकामाचा टप्पा * | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ० | १ | ३ | ० | ५ | ० | ० | ४ | ० | २ | ० | ० | ० | १ | ० | ० |

९. मालकाने बांधकाम प्रकल्प पूर्ण झाल्यापासून अथवा वसुली / निर्धारण अधिकाऱ्यांने उपकर वसुलीची रक्कम वसुल केलेल्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत संबंधीत वसुली अधिकाऱ्यांने उपकराचा रक्कम जमा करावी.

१०. ज्या ठिकाणी बांधकाम प्रकल्पाची मुदत एक वर्षापेक्षा जास्त असेल अशावेळी बांधकामाचा आदेश मिळाल्यापासून ते बांधकाम पूर्ण होईपर्यंत प्रत्येक वर्षी ३० दिवसांचे आत परंतु आर्थिक वर्षाच्या १५मे पूर्वी मालकाने उपकराची रक्कम वसुल करुन ती जमा करावयाची आहे.

११. मालकाने बांधकाम बद्दलचे देयक सादर केल्यानंतर वसुली अधिकारी यांनी उपकराची १ % रक्कम सदर देयकामधून कपात करुन द्यावी.

१२. नियोक्ता उपकराची अंदाजीत रक्कम आगावू उपकर वसुली अधिकारी यांचेकडे जमा करु शकतो.

१३. आगावू जमा केलेल्या उपकराची रक्कम वसुली / निर्धारण अधिकाऱ्यांने ठरवून दिलेल्या अंतिम उपकराच्या रकमेतून समायोजित करावी.

१४. उपकर अधिनियम, व त्या अंतर्गत नियमाच्या तरतुदीनुसार जर पुर्तता केली नाही तर महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. बीसीए२००९/प्र.क.१०८/कामगार ७ -अ/मंत्रालय दि. १७/६/२०१० मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार व संदर्भीय कायद्यांच्या कलम क्र. ३,५,१० व १२ नुसार व्याज किंवा दंडांची आकारणी करण्यात यावी.

सदर परिपत्रक कंपनीच्या Interanet वर प्रसिध्द करण्यात आले असून त्यांची प्रत टपालाद्वारे पाठविण्यात येणार नाही.

सोबत : १) युनिक कोड (प्रपत्र-अ)
२) परिशिष्ट क्र. ०१ ते ०४

(अभिजित देशपांडे)
कार्यकारी संचालक (मा.सं.)

प्रेषण यादीनुसार कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत

# प्रपत्र - अ

## युनिक कोड संदर्भात वापरावयाचे परीमंडल/ मंडल/ विभागीय कार्यालयाचे कोड नंबर

| Zone | Unic Code | Circle | Unic Code | Division | Unic Code |
|---|---|---|---|---|---|
| HO Zone | 01 | APDRP | 001 | | |
| | | Infra | 002 | | |
| | | Civil Dept. | 003 | | |
| Amravati Zone | 02 | Akola Circle | 001 | Akola Rural | 001 |
| | | | | Akola Testing | 002 |
| | | | | Akola Urban | 003 |
| | | Amravati Circle | 002 | Achalpur | 001 |
| | | | | Amravati Testing | 002 |
| | | | | Amravati Rural | 003 |
| | | | | Amravati Urban | 004 |
| | | | | Morshi | 005 |
| | | Buldana Circle | 003 | Buldana | 001 |
| | | | | Khamgaon | 002 |
| | | | | Malkapur | 003 |
| | | Washim Circle | 004 | Washim | 001 |
| | | Yavatmal Circle | 005 | Pandharkawda | 001 |
| | | | | Pusad Division | 002 |
| | | | | Yavatmal | 003 |
| Aurangabad Zone | 03 | Aurangabad (R) Circle | 001 | Aurangabad Nodal Office | 001 |
| | | | | Aurangabad Rural Dn. | 002 |
| | | | | Aurangabad (R)Testing Dn. | 003 |
| | | | | Kannad Division | 004 |
| | | Aurangabad (U) Circle | 002 | Aurangabad (U) Dn. No.II | 001 |
| | | | | Aurangabad Testing Dn. | 002 |
| | | | | Aurangabad (U) Dn.No.I | 003 |
| | | Jalna Circle | 003 | Jalna Dn. No.I | 001 |
| | | | | Jalna Dn. No.II | 002 |
| | | | | Jalna Testing Dn. | 003 |
| Baramati Zone | 04 | Baramati (R) Circle | 001 | Baramati Dn. | 001 |
| | | | | Baramati Testing Dn. | 002 |
| | | | | Pune Kedgaon Dn. | 003 |
| | | | | Saswad Division | 004 |
| | | Satara Circle | 002 | Karad Division | 001 |
| | | | | Phaltan Division | 002 |
| | | | | Satara Division | 003 |
| | | | | Satara Testing Dn. | 004 |
| | | | | Vaduj Division | 005 |
| | | | | Wai Division | 006 |
| | | Solapur Circle | 003 | Akluj Division | 001 |
| | | | | Barsi Division | 002 |
| | | | | Pandharpur Dn. | 003 |
| | | | | Solapur Rural Dn. | 004 |
| | | | | Solapur Testing Dn. | 005 |
| | | | | Solapur Urban Dn. | 006 |

| Zone | Unic Code | Circle | Unic Code | Division | Unic Code |
|---|---|---|---|---|---|
| Bhandup (U) Zone | 05 | Thane (U) Circle | 001 | Bhandup Dn. | 001 |
| | | | | Thane I Dn. | 002 |
| | | | | Thane II Dn. | 003 |
| | | | | Mulund Dn. | 004 |
| | | | | Thane III Dn. | 005 |
| | | | | Wagle Estate Dn. | 006 |
| | | | | Bhandup Testing Dn. | 007 |
| | | Vashi Circle | 002 | Vashi Division | 001 |
| | | | | Vashi Testing Dn. | 002 |
| | | | | Nerul Division | 003 |
| | | | | Panvel Urban Dn. | 004 |
| | | Bhiwandi Circle | 003 | | |
| Jalgaon Zone | 06 | Dhule Circle | 001 | Dhule CC O&M Rural Dn. | 001 |
| | | | | Dhule Testing Dn. | 002 |
| | | | | Dhule UCR Dn. | 003 |
| | | | | Dondaicha Dn. | 004 |
| | | Jalgaon Circle | 002 | Bhusawal U&R Dn. | 001 |
| | | | | Chalisgaon Dn. | 002 |
| | | | | Dharangaon Dn. | 003 |
| | | | | Jalgaon Division | 004 |
| | | | | Jalgaon Testing Dn. | 005 |
| | | | | Pachora Dn. | 006 |
| | | | | Savada O&M Dn. | 007 |
| | | Nandurbar Circle | 003 | Nandurbar Dn. | 001 |
| | | | | Shahada Dn. | 002 |
| Kalyan Zone | 07 | Kalyan Circle No-I | 001 | Dombivli Urban Dn. | 001 |
| | | | | Kalyan East Dn. | 002 |
| | | | | Kalyan Testing Dn. | 003 |
| | | | | Kalyan West (U) Dn. | 004 |
| | | Kalyan Circle No-II | 002 | Kalyan Rural Dn. | 001 |
| | | | | Kalyan Testing Dn.-II | 002 |
| | | | | Ulhasnagar Dn. No-I | 003 |
| | | | | Ulhasnagar Dn. No-II | 004 |
| | | Kalyan TQA Circle | 003 | | |
| | | Pen Circle | 004 | Alibag Division | 001 |
| | | | | Goregaon Dn. | 002 |
| | | | | Panvel Rural Dn. | 003 |
| | | | | Pen Testing Dn. | 004 |
| | | | | Roha Division | 005 |
| | | Vasai Circle | 005 | Palghar Division | 001 |
| | | | | Vasai Division | 002 |
| | | | | Vasai Testing Dn. | 003 |
| | | | | Virar Division | 004 |
| Kolhapur Zone | 08 | Kolhapur Circle | 001 | Gadhinglaj Dn. | 001 |
| | | | | Ichalakranji Dn. | 002 |
| | | | | Jaysingpur Dn. | 003 |
| | | | | Kolhapur (R) Dn. No.II | 004 |
| | | | | Kolhapur (R) Dn. No.I | 005 |
| | | | | Kolhapur Testing Dn. | 006 |
| | | | | Kolhapur Urban Dn. | 007 |

| Zone | Unic Code | Circle | Unic Code | Division | Unic Code |
|---|---|---|---|---|---|
| | | Sangli Circle | 002 | Islampur Dn. | 001 |
| | | | | Kavathe Mahankal Dn. | 002 |
| | | | | Sangli Rural Dn. | 003 |
| | | | | Sangli Testing Dn. | 004 |
| | | | | Sangli Urban Dn. | 005 |
| | | | | Vita Division | 006 |
| Latur Zone | 09 | Beed Circle | 001 | Ambajogai Dn. | 001 |
| | | | | Beed Division | 002 |
| | | Latur Circle | 002 | Latur Division | 001 |
| | | | | Latur Testing Dn. | 002 |
| | | | | Nilanga Division | 003 |
| | | | | Udgir Division | 004 |
| | | Osmanabad Circle | 003 | Osmanabad Dn. | 001 |
| | | | | Tuljapur Dn. | 002 |
| Nagpur Urban Zone | 10 | NAGPUR (R) Circle | 001 | KATOL DN | 001 |
| | | | | NAGPUR O&M Dn. No.-I | 002 |
| | | | | NAGPUR O&M Dn. No.-II | 003 |
| | | | | NRC Testing Dn.(R) Nagpur | 004 |
| | | Nagpur Testing Circle | 002 | | |
| | | Nagpur Urban Circle | 003 | NAGPUR CIVIL LINES (U) Dn. | 001 |
| | | | | NAGPUR CONGRESS NAGAR (U) Dn. | 002 |
| | | | | NAGPUR GANDHIBAGH (U) Dn. | 003 |
| | | | | NAGPUR MAHAL (U) Dn. | 004 |
| | | | | NAGPUR MIDC URBAN DN | 005 |
| | | | | NAGPUR TESTING URBAN DN | 006 |
| | | | | Nagpur Nodal Offuce | 007 |
| Nagpur Zone | 11 | Bhandara Circle | 001 | Bhandara Dn. | 001 |
| | | | | Bhandara Testing Dn. | 002 |
| | | | | Sakoli Division | 003 |
| | | Chandrapur O&M Circle | 002 | Ballarshah Dn. | 001 |
| | | | | Chandrapur Dn. | 002 |
| | | | | Chandrapur Testing Dn. | 003 |
| | | | | Warora Dn. | 004 |
| | | Gadchiroli O&M Circle | 003 | Allapalli O&M Dn. | 001 |
| | | | | Bramhapuri Dn. | 002 |
| | | | | Gadchiroli Dn. | 003 |
| | | Gondia O&M Circle | 004 | Deori Division(Gondia) | 001 |
| | | | | Gondia Division | 002 |
| | | Wardha O&M Circle | 005 | Arvi Division | 001 |
| | | | | Hinganghat Dn. | 002 |
| | | | | Wardha Dn. | 003 |
| Nanded Zone | 12 | Hingoli Circle | 001 | HINGOLI Dn. | 001 |
| | | Nanded Circle | 002 | Bhokar Division | 001 |
| | | | | Degloor Division | 002 |
| | | | | Nanded Dn. | 003 |
| | | | | Nanded Rural Dn. | 004 |
| | | | | Testing Division Nanded | 005 |
| | | Parbhani Circle | 003 | Parbhani Dn. | 001 |
| | | | | Parbhani testing Dn. | 002 |

| Zone | Unic Code | Circle | Unic Code | Division | Unic Code |
|---|---|---|---|---|---|
| Nasik Zone | 13 | Ahmednagar Circle | 001 | Ahmednagar Testing Dn. | 001 |
| | | | | Ahmednagar (U) Cum (R) Dn. | 002 |
| | | | | Karjat Division | 003 |
| | | | | Mula Pravara Dn. | 004 |
| | | | | Rural Dn.Ahmednagar | 005 |
| | | | | Sangamner Dn. | 006 |
| | | Nasik Rural Circle | 002 | Chandwad Dn. | 001 |
| | | | | Kalwan Division | 002 |
| | | | | Malegaon (UCR) Dn. | 003 |
| | | | | Manmad Dn. | 004 |
| | | | | Nasik Rural Dn. | 005 |
| | | | | Nasik (R) Testing Dn. | 006 |
| | | | | Satana Division | 007 |
| | | Nasik Urban Circle | 003 | Nasik Testing Dn. | 001 |
| | | | | Urban-I Dn. Nashik | 002 |
| | | | | Urban-II Dn. Nashik Road | 003 |
| Pune Zone | 14 | Ganeshkhind (U) Circle | 001 | Pune Bhosari Dn. | 001 |
| | | | | Pune Ganeshkhind Testing Dn. | 002 |
| | | | | Pune Kothrud Dn. | 003 |
| | | | | Pune Pimpri Dn. | 004 |
| | | | | Pune Shivajinagar Dn. | 005 |
| | | Pune Rural Circle | 002 | Manchar Dn. | 001 |
| | | | | Pune Mulshi Dn. | 002 |
| | | | | Pune (R) Testing Division | 003 |
| | | | | Rajgurunagar Dn. | 004 |
| | | Pune TQA Circle | 003 | | |
| | | Rastapeth (U) Circle | 004 | Pune Bundgarden Dn. | 001 |
| | | | | Pune Nagar Road Dn. | 002 |
| | | | | Pune Padmavati Dn. | 003 |
| | | | | Pune Parvati Dn. | 004 |
| | | | | Pune Rastapeth Dn. | 005 |
| | | | | Pune Rastapeth Testing Dn. | 006 |
| Ratnagiri Zone | 15 | Ratnagiri Circle | 001 | Chiplun Division | 001 |
| | | | | Khed Division | 002 |
| | | | | Ratnagiri Dn. | 003 |
| | | | | Ratnagiri Testing Dn. | 004 |
| | | Sindhudurg Circle | 002 | Kankavali Dn. | 001 |
| | | | | Kudal Division | 002 |

# परिशिष्ट-१

प्रपत्र १ (नियम ७)
नोंदणी क्र.

## इमारत व इतर बांधकाम कामगार

(रोजगार नियमन व सेवाशर्ती)
अधिनियम, १९९६ अंतर्गत
नोंदणी प्राधिकरी

१) आस्थापनेचे नांव :-
२) पत्ता :-
३) कामाचे नांव / स्वरुप :-
४) नियुक्त केलेले कामगार संख्या :-
५) काम सुरुवात झाल्याची तारीख /महीना/वर्ष — कामाची अंदाजे कालावधी महिने /वर्ष

| ६) | बांधकामाचे अंदाजीत मुल्य | | उपकर भरण्याबाबतचा तपशिल |
|---|---|---|---|
| | टप्पे | मुल्य | रक्कम, चलन क्र. व दिनांक |
| | | | |

पहिल वर्ष
दुसरे वर्ष
तिसरे वर्ष
चौथे वर्ष

एकूण

---

मालकाची स्वाक्षरी :-
मालकाचे नांव :-
दिनांक :-

वसुली अधिकाऱ्यांने भरावयाचे
७) पुर्णत्वाची तारीख
८) अंतिम मुल्य
९) वसुली तारीख
१०) वसुली रक्कम
११) अपिलाची तारीख असल्यास
१२) अपिलासंबंधीच्या आदेशाची तारीख
१३) अपिलाच्या आदेशानुसार रक्कम
१४) उपकराची रक्कम मंडळात जमा केल्याची तारीख
१५) हस्तांतरीत रक्कम चलन क्र. व दिनांक

वसुली अधिकाऱ्यांची स्वाक्षरी :-
हुद्दा :-

# परिशिष्ट -२

## उपकरापोटी जमा करण्यात आलेल्या रक्कमेचा तपशिल दर्शविणारा मासिक तक्ता

| अ. क्र. | कंत्राटदाराचे नांव व पत्ता | सुपुर्द करण्यात आलेल्या कामाचा तपशिल | बिलापोटी देण्यात आलेली एकूण रक्कम | बिले देण्यात आलेल्या तारखा | कपात करण्यात आलेल्या उपकराची रक्कम | उपकराची रक्कम मंडळास जमा केल्याबाबतचा तपशिल | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | तारीख | चलन क्रमांक | रक्कम |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

# परिशिष्ट - ३

**शासकिय विभाग /स्थानिक संस्था /सार्वजनिक उपक्रमातर्फे सादर करावयाचे वार्षिक विवरण**

**सन २०   करीता**

विभागाचे नांव :-

आहरण व संवितरण (Drawing & Disbursing Anthority) अधिकाऱ्यांचे नांव व हुद्दा :-

नोंदणी क्रमांक :-

इमारत व इतर बांधकाम अधिनियम अंतर्गत

आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचा संदर्भ क्रमांक :-

| अ. क्र. | ज्यावर्षी काम सुरु करण्यात आले त्या वर्षात देण्यात आलेल्या कामाची संख्या | ज्या वर्षात कंत्राटदारांना कामाची बिले अदा करण्यात आली त्याबाबत कामाच्या कामाची संख्या | दिलेल्या एकुण बिलाची रक्कम | कपात करण्यात आलेल्या उपकराची रक्कम | भरण करण्यात आलेल्या उपकराची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

# परिशिष्ठ - ४

## आराखडे मंजूर करणाऱ्या प्राधिकाऱ्यांकडून सादर करावयाचे वार्षिक विवरण

**सन २०     करीता**

**कार्यालयाचे नांव व आराखडा मंजुर करणाऱ्यां प्राधिकाऱ्यांचा हुद्दा**

**संदर्भ क्रमांक**

| अ.क्र. | आर्थिक वर्षात मंजुर करण्यात आलेल्या आराखड्याची संख्या | जमा केलेल्या उपकराची रक्कम रुपये | भरणा केलेल्या उपकराची रक्कम रुपये | सर्व १२ महिन्याचे मासिक विवरणपत्र सादर केले आहेत काय आणि भरणा केलेल्या उपकराची रक्कमेचा मेळ बसला काय | जमा करण्यात आलेल्या उपकरासंबंधी झालेला प्रत्यक्ष खर्च (१- पेक्षा जास्त नसलेला) | मंडळातर्फे आराखडे मंजूर करण्यात आलेल्या आधिकाऱ्यांना उपकर गोळा करण्यासाठी खर्च करण्यात आलेल्या रक्कमेची करण्यात आलेल्या परीपुर्ती बाबतचा तपशिल (मंडळाकरीता) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |